


महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई ● नवी मुंबई ● ठाणे ● पालघर ● रायगड

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा घोडविंदे (एम.डी.)

सोमवार ■ २० ऑक्टोबर २०२५ ■ वर्ष - सातवे ■ अंक : ११७ ■ RNI No. MAHMAR/2016/7209 ■ किंमत - ०२ रुपये


## लक्षवेधी

## कल्याणच्या शेतीचे पंचनामे पूर्ण

### शेतकऱ्यांना मिळाला दिलासा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण:** कल्याण तालुक्यातील शेतकऱ्यांना दिलासा मिळणार आहे. नुकसान झालेल्या शेतीचे पंचनामे पूर्ण झाले असून, दिवाळीआधीच त्यांना नुकसान भरपाई दिली जाणार असल्याची माहिती तहसीलदार कार्यालयाकडून देण्यात आली. कल्याण तालुक्यातील शेतकऱ्यांना दिवाळीआधी दिलासा मिळाला आहे. संपूर्ण महाराष्ट्रात सप्टेंबर महिन्यात पावसाने हाहाकार माजवला होता. अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला घास हिरावून घेतला गेला. मोठ्या प्रमाणा पिकांचे नुकसान झाले. होत्याचे नव्हते झाले. अनेकांचे संसार उद्ध्वस्त झाले. शेतकरी संकटात आहे. बळीराजा मेटाकुटीला आल्याचे चित्र पाहायला मिळाले. नद्यांना पूर आल्याने पिकांचेच नुकसान झाले नाही, तर शेतातील मातीही खरवडून गेली आहे. सरकारने लवकरात लवकर नुकसान भरपाई द्यावी, अशी मागणी होत आहे. कल्याणमधील शेतकऱ्यांसाठी दिवाळी आधीच गोड बातमी मिळणार आहे. दिवाळीआधी त्यांना नुकसान भरपाई मिळणार असल्याची माहिती तहसीलदार कार्यालयाने दिली.

## 'भाऊबंदकी'नंतर आता राज्यात 'मनोमिलन' नाटक सुरू

### - एकनाथ शिंदे



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**अंबरनाथ :** पूर्वी भाऊबंदकी हे नाटक गाजले होते मात्र आता राज्यात मनोमिलन नाटक सुरू आहे, असे सांगत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांच्या भेटींवर जोरदार टीकास्त्र सोडले. अंबरनाथ शहरातील बहुप्रतिक्षित नाट्यगृहाचे लोकार्पण रविवारी संपन्न झाले. यावेळी एकनाथ शिंदे यांनी नाट्य कलावंताच्या उपस्थितीत विरोधकांना कोपरखळ्या दिल्या. अशोक सराफ यांचे सारख छातीत दुखतंय हे नाटक प्रसिद्ध होते. पण आमचे काम पाहून विरोधकांच्या पोटात पण दुखतंय, असाही टोला एकनाथ शिंदे यांनी यावेळी लगावला. सर्व कलाकारांनी किमान एक नाटक इथे करावे, असे आवाहन यावेळी शिंदे यांनी उपस्थित कलावंतांना केले अंबरनाथ शहरातील बहुप्रतिक्षित नाट्यगृहाचे रविवारी दिमाखदार सोहळ्यात लोकार्पण संपन्न झाले. यावेळी नाट्य, सिने क्षेत्रातील नामवंत कलाकारांनी हजेरी लावली होती. या नाट्यगृहाला धर्मवीर आनंद दिघे यांचे नाव देण्यात आले. तर यातील रंगमंचाला नाटककार बाळ कोल्हटकर प्यांचे नाव देण्यात आले. यावेळी नाट्यगृहाच्या परिसरात लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्याची स्थापना करण्यात येईल, अशी घोषणा यावेळी खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी केली.

## रांगोळी प्रदर्शनातून सृजनशीलतेची सजावट



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** रांगोळीच्या रंगांची उधळण, परंपरेचा सन्मान आणि कलाकारांची कल्पकता यांचे सुंदर मिलन ठाण्यात पाहायला मिळत आहे. कलाछंद रांगोळीकार मंडळ आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या संयुक्त विद्यमाने व्यक्तीचित्र रांगोळींचे 'भव्य रांगोळी प्रदर्शन २०२५' वर्तकनगर भागातील ब्राह्मण विद्यालयात भरविण्यात आले आहे. हे प्रदर्शन २० ते २६ ऑक्टोबर याकालावधीत सायंकाळी ५ वाजल्यापासून रात्री १० वाजेपर्यंत नागरिकांसाठी खुले असणार आहे.

# ओबीसींचा विकास ही शासनाची जबाबदारी

### - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई :** मराठा आंदोलक मनोज जरांगे यांच्या नेतृत्वात आझाद मैदानात झालेल्या आंदोलनानंतर राज्य शासनाने हैदराबाद गॅझेटियर आणि ५८ लाख नोंदीसंदर्भात शासन निर्णय जाहीर केला. त्यामुळे, मराठवाड्याच्या ५ जिल्ह्यातील मराठा बांधवांना आता कुणबी प्रमाणपत्र मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

मात्र, मराठा समाजाला आता ओबीसीतून आरक्षण मिळणार, असल्याने ओबीसी समाज आक्रमक झाला आहे. यावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मराठा आणि ओबीसी समाजाच्या आरक्षणासाठी कुठली निती वापरली यावर भाष्य केले. महात्मा ज्योतीबी फुले संशोधन व प्रशिक्षण संस्थेची (महाज्योती) नवीन प्रशासकीय इमारत आणि प्रशिक्षण केंद्राचे मुख्यमंत्र्यांच्याहस्ते भूमिपूजन करण्यात आले. यावेळी ते बोलत होते.

कार्यक्रमाला महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, इतर बहूजन कल्याण मंत्री अतुल सावे, राज्यमंत्री पंकज भोयर उपस्थित होते. मुख्यमंत्री म्हणाले, राज्यात बहूसंख्य असलेल्या ओबीसींचा विकास ही राज्याची जबादबारी आहे. तोपर्यंत विकासाची संकल्पना पूर्ण होऊ शकत नाही. मराठा, ओबीसी, धनगर आणि इतर समाजाच्या अडचणी समजून त्यांना न्याय देण्याचा प्रयत्न केला.

आपण सर्व छत्रपती शिवाजी महाराजांचे मावळे आहोत. महाराजांनी



सर्व जातींना एकत्र करून स्वराज्याची स्थापना केली. त्यांनी गुलामगीरीच्या बेड्या तोडल्या. हीच आमच्या सरकारचीही निती आहे. कुठल्या समाजाचे काढायचे आणि दुसऱ्या समाजाला द्यायचे हे धोरण आमचे सरकार कधीच स्वीकारणार नाही. कोणत्याही समाजावर अन्याय करणारे निर्णय कधीही घेतले नाही आणि घेणार नाही, असेही मुख्यमंत्री म्हणाले.

**नेमके काय म्हणाले फडणवीस**

महाराष्ट्राचा मुख्यमंत्री म्हणून २०१४ मध्ये शपथ घेतल्यावर पहिले काम हे ओबीसींचे मंत्रालय स्थापन करण्याचे केले. सरकार म्हणून आजपर्यंत कधीही जातीपातीचे राजकारण न करता मराठा आणि ओबीसी समाजाला न्याय देण्याचा कायम प्रयत्न केला. हीच छत्रपती शिवाजी महाराजांची नीती असून त्याचे कायम पालन करत राहू, असे आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

**ओबीसींसाठी आतापर्यंत मुख्यमंत्र्यांनी काय केले?**

महाज्योतीच्या कार्यालयाची इमारत आणि प्रशिक्षण केंद्राच्या माध्यमातून अनेक वर्षांचे स्वप्न आज साकार होत आहे. ओबीसी हा ३५० जातींचा समूह असतानाही त्यांच्या उथ्थानासाठी कुठलाही कार्यक्रम नव्हता. त्यामुळे ओबीसी समाजाची सामाजिक, आर्थिक प्रगती साधण्यासाठी वेगवेगळया योजना सुरू करण्याचा विचार करूनच ओबीसी मंत्रालय आणि महाज्योतीसारख्या संस्था स्थापन केल्या. महात्मा ज्योतीबा फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी केवळ शिक्षणाचेच महत्व सांगीतले नाही, तर ते उत्तम व्यवसायिक होते. त्यामुळे त्यांनी ओबीसी समाजाला आपल्या पायावर उभे राहण्यासाठी स्वयंरोजगार, व्यवसाय करण्याचा सल्लाही दिला. याच विचार करून आमच्या सरकारने विविध प्रशिक्षणाच्या योजना सुरू केल्या. २०२२ मध्ये माझ्याकडे उपमुख्यमंत्री आणि अर्थमंत्री म्हणून जबाबदारी आल्यावर महाज्योतीला हवा तेवढा निधी उपलब्ध करून दिला. साठपेक्षा अधिक वसतिगृह सुरू केले. आधी केवळ घोषणा व्हायच्या मात्र, आता कृती होते. ओबीसींना आर्थिक विकास महामंडळाकडून १५ लाख रुपये बिनव्याजी कर्ज देऊन स्वतःच्या पायावर उभे करणार आहोत. १०० टक्के ओबीसींना घरकुल देण्याचे काम सरकारने केले, असेही फडणवीस यांनी सांगीतले.

# ऐन दिवाळीत प्रवाशांमध्ये संताप

## मुंबई-नांदेड वंदे भारत 6 तास विलंब



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

बातमीदार

**मुंबई :** मुंबई-नांदेड वंदे भारत एक्सप्रेस (ट्रेन क्र. २०७०६) रविवारीच्या अचानक विलंबामुळे प्रवाशांमध्ये गंभीर असंतोष पसरला आहे. मूळ वेळेनुसार दुपारी १:१० वाजता सीएसएमटीहून निघणारी ट्रेन तब्बल सहा तास उशिरा, संध्याकाळी ७:३० वाजता सुरू झाली. या विलंबाची माहिती प्रवाशांना सकाळी सुमारे १०:३० वाजता दिली गेली, ज्यामुळे दिवाळी सणासाठीचे नियोजन पूर्णपणे बिघडले. विशेषतः कुटुंबांसह प्रवाशांना, ज्यात लहान मुले होती, ही विलंबाची परिस्थिती अत्यंत त्रासदायक ठरली. रेल्वे स्थानकावर कोणतीही योग्य सोय, पर्यायी व्यवस्था किंवा अन्नप्रदान करण्यात आलेले

### ऐन दिवाळीत गावी जाणाऱ्या प्रवाशांचे प्रचंड हाल

नव्हते. प्रवाशांना तासन्तास थांबावे लागले आणि कोणतीही स्पष्ट माहिती उपलब्ध नव्हती. अडकलेल्या प्रवाशांसाठी अन्न व लाउंज सुविधा उपलब्ध कराव्यात, आधीच भरलेले ऑनबोर्ड केटरिंग शुल्क परत केले जावे, मानसिक व शारीरिक त्रासासाठी तिकिट भावाच्या तीन पट नुकसानभरपाई दिली जावी, तसेच रेल्वेने लिखित माफी देऊन भविष्यात विलंबाच्या वेळी प्रवाशांशी योग्य संवाद व सुविधा याची हमी द्यावी अशी तक्रार प्रवासी प्रदीप पाटील यांनी सीएसएमटी स्टेशन मास्टरकडे केली .

### प्रवाशांना आर्थिक भुर्दंड

रेल्वेच्या नियोजनातील कमतरतेमुळे रविवारच्या मेगाब्लॉकमध्ये अनेक प्रवाशांनी दोन तास अगोदरच सीएसएमटी स्थानकावर धाव घेतली होती, पण विलंबाची माहिती वेळेत न मिळाल्याने ते सहा तास थांबण्यासाठी विवश झाले. निशुल्क प्रतीक्षालयात जागा नव्हती, तर पेड प्रतीक्षालयात बसण्यासाठी चार्जेस घेतले जात होते. त्यामुळे प्रवाशांना आर्थिक भूदंड बसलेला आहेत. रेल्वेने दिवाळी हंगामात प्रवाशांची गैरसोय टाळण्यासाठी योग्य नियोजन करणे आवश्यक आहे, अन्यथा प्रवाशांचे विसंगत अनुभव वाढतच राहतील.

### तळकोकणातील बालरुग्णांना मिळणार दिलासा

# ठाणे जिल्हा रुग्णालयात बाल डायलिसिस केंद्र उभारणी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** ठाणे सिव्हिल रुग्णालयात बाल डायलिसिस केंद्र मंजूर झाले आहे. यामुळे ठाणे, पालघर आणि जवळपासच्या जिल्ह्यांतील नव्हे, तर महाराष्ट्र-गुजरात सीमेपासून ते तळकोकण आणि गोव्याच्या वेशीपर्यंतच्या बालरुग्णांना मोठा दिलासा मिळणार असल्याचे मत भाजप आमदार निरंजन डावखरे यांनी व्यक्त केले आहे.

निरंजन डावखरे यांच्या उपस्थितीत ठाणे सिव्हिल रुग्णालयात मंजूर झालेल्या बाल डायलिसिस केंद्राच्या उभारणीसाठी प्राथमिक पाहणी करण्यात आली. त्या वेळी त्यांनी हे मत व्यक्त केले. निरंजन डावखरे यांनी ठाणे जिल्हा सामान्य रुग्णालयात बाल डायलिसिस केंद्राच्या उभारणीबाबत विधान परिषदेत उपस्थित केलेल्या प्रश्नावर राज्याचे आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला.



जुलै महिन्यात सादर केलेल्या निवेदनावर त्यांनी या प्रकल्पाला तत्काळ मंजुरी दिली. प्रकल्पाच्या प्रगतीचा आणि पुढील टप्प्यांचा आढावा घेण्यासाठी नुकतीच उच्चस्तरीय बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीस निरंजन डावखरे, ठाणे सिव्हिल रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक व जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. कैलास पवार, बालरोगतज्ज्ञ व नेफ्रोलॉजिस्ट डॉ. उमा अली (वाडिया हॉस्पिटल), बालरोगतज्ज्ञ डॉ. परमानंद, डॉ. शानबाग (सायन हॉस्पिटल) आणि इतर वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. या वेळी हा प्रकल्प पूर्णत्वास आल्यानंतर ठाणे सिव्हिल रुग्णालय हे कोकण-ठाणे विभागातील बाल डायलिसिस सुविधा असलेले पहिले जिल्हा रुग्णालय ठरणार असून, यामुळे बाल आरोग्यसेवांच्या नव्या पर्वाची सुरुवात ठाण्यापासून होईल, असा विश्वास निरंजन डावखरे यांनी व्यक्त केला.

**बैठकीत महत्त्वाच्या मुद्द्यांवर चर्चा**

बैठकीदरम्यान केंद्राचे आराखडे, वैद्यकीय उपकरणे, बांधकाम संरचना, सुविधा आणि मनुष्यबळ या बहुआयामी घटकांवर सखोल चर्चा करण्यात आली. त्यानंतर ठाणे सिव्हिल रुग्णालयात प्रत्यक्ष पाहणी करून आवश्यक पायाभूत सुविधा, वैद्यकीय साधनसामग्री आणि डायलिसिस केंद्राच्या कार्यप्रणालीबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.









# नवी मुंबईत देशातील सर्वात मोठे रेडिएशन थेरपी केंद्र



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** कर्करोगावरील उपचार, संशोधन आणि शिक्षणासाठी नवी मुंबईतील टाटा मेमोरियलच्या प्रगत केंद्रात नवीन कॅन्सर केअर इमारतीचे बांधकाम सुरू करण्याची घोषणा आयसीआयसीआय बँक आणि टाटा मेमोरियल सेंटरने केली आहे. बँकेच्या सीएसआर उपक्रमांतर्गत ६२५ कोटी रुपयांच्या योगदानाच्या साहाय्याने हे केंद्र भारतातील सर्वात मोठ्या रेडिएशन थेरपी केंद्रांपैकी एक असणार आहे, अशी माहिती सुत्रांकडून देण्यात आली. 'आयसीआयसीआय फाउंडेशन ब्लॉक फॉर रेडिएशन ऑन्कोलॉजी' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या इमारतीचे भूमीपूजन सोहळा रविवारी पार पडला. यावेळी आयसीआयसीआय बँकेचे अध्यक्ष प्रदीप कुमार सिन्हा, कार्यकारी संचालक संदीप बत्रा, कार्यकारी संचालक अजय गुप्ता आणि टाटा मेमोरियल सेंटरचे संचालक डॉ. सुदीप गुप्ता हे यावेळी उपस्थित होते.

तळमजला तसेच दोन बेसमेंट असलेली ११ मजली इमारत ३.४ लाख चौरस फुटांवर बांधली जाणार आहे. यामध्ये १२ अत्याधुनिक लिनियर एक्सीलरेटर्स आणि कर्करोगाशी संबंधित इतर प्रगत उपकरणे असणार आहेत. 'आयसीआयसीआय फाउंडेशन ब्लॉक फॉर रेडिएशन ऑन्कोलॉजी' दरवर्षी ७ हजार २०० रुग्णांना रेडिएशन थेरपीची सोय उपलब्ध करून देणार आहेत. या अंतर्गत रुग्णांची दोन लाखांहून अधिक रेडिएशन सत्रांची सोय केली जाणार आहे. या व्यतिरिक्त, वर्षभरात २५ हजार नवीन रुग्णांना ओपीडी सल्ला तसेच निदान करण्यास मदत करेल. हे केंद्र २०२७ पर्यंत पूर्ण होणार असल्याची चिन्हे आहेत. आयसीआयसीआय बँकेची सीएसआर शाखा, आयसीआयसीआय फाऊंडेशन फॉर इन्क्लुजिव्ह ग्रोथ, या केंद्राचे बांधकाम आणि एकूणच कामकाजावर देखरेख ठेवणार आहे. या भूमीपूजन सोहळ्या प्रसंगी आयसीआयसीआय बँकेचे अध्यक्ष प्रदीप कुमार सिन्हा म्हणाले, "आयसीआयसीआय फाउंडेशन फॉर इन्क्लुझिव्ह ग्रोथ या आपल्या सीएसआर शाखेद्वारे आयसीआयसीआय बँक आरोग्यसेवा, पर्यावरण संवर्धन, शाश्वत उपजीविका आणि सामुदायिक विकास प्रकल्प या चार संकल्पनांवर काम करत आहे.

देशातील महत्त्वाच्या आरोग्यसेवा पायाभूत सुविधांना बळकटी देण्याच्या आमच्या प्रयत्न आहे. कर्करोग काळजी मोहिमेत टीएमसीसोबत भागीदारी करताना आम्हाला आनंद होत आहे. हे केंद्र पूर्ण झाल्यानंतर आणि संपूर्ण क्षमतेने कार्यान्वित झाल्यानंतर 'आयसीआयसीआय फाउंडेशन ब्लॉक फॉर रेडिएशन ऑन्कोलॉजी' रेडिएशन थेरपीसाठी भारतातील सर्वात मोठ्या केंद्रांपैकी एक असणार आहे."



# नरक चतुर्दशीचे महत्त्व आणि अध्यात्मशास्त्र

आश्विन वद्य चतुर्दशीला नरकासुर राक्षसाच्या वधाप्रित्यर्थ दिवाळीतील या सणाच्या दिवशी पहाटे सूर्योदयापूर्वी उठून अभ्यंगस्नान केले जाते. या दिवशी यमदीपदान करून ब्राह्मणांना भोजन आणि वस्त्रांचे दानही दिले जाते. या सणाचे महत्त्व आणि या दिवशी करण्यात येणाऱ्या कृतींमागील शास्त्र सनातन संस्थेद्वारा संकलित केलेल्या या लेखातून पहाणार आहोत.

**1. इतिहास** : 'श्रीमद्भागवतपुराणात अशी एक कथा आहे - पूर्वी प्राग्ज्योतिषपूर येथे भौमासुर किंवा नरकासुर या नावाचा एक बलाढ्य असुर राज्य करत होता. देव आणि मानव यांना तो फार पीडा देऊ लागला. हा दुष्ट दैत्य स्त्रियांना पीडा देऊ लागला. त्याने जिंकून आणलेल्या सोळा सहस्र उपवर राजकन्यांना कारागृहात कोंडून ठेवले आणि त्यांच्याशी विवाह करण्याचा बेत केला. त्यामुळे जिकडेतिकडे हाहाःकार उडाला. श्रीकृष्णाला हे वृत्त समजताच सत्यभामेसह त्याने नरकासुरावर आक्रमण केले आणि त्याला ठार करून सर्व राजकन्यांना मुक्त केले. मरतांना नरकासुराने कृष्णाकडे वर मागितला, 'आजच्या तिथीला जो मंगलस्नान करील, त्याला नरकाची पीडा होऊ नये.' कृष्णाने तसा वर त्याला दिला. त्यामुळे आश्विन वद्य चतुर्दशी ही 'नरक चतुर्दशी' मानली जाऊ लागली आणि लोक त्या दिवशी सूर्योदयापूर्वी अभ्यंगस्नान करू लागले. चतुर्दशीच्या पहाटे नरकासुरास ठार करून त्याच्या रक्ताचा टिळा कपाळास लावून श्रीकृष्ण घरी येताच मातांनी त्याला आलिंगन दिले. स्त्रियांनी दिवे ओवाळून आनंद व्यक्त केला.

**2. सण साजरा करण्याची पद्धत :**

अभ्यंगस्नान - गुढीपाडवा, दिवाळी इत्यादी सणांना 'अभ्यंगस्नान' करावे असे धर्मशास्त्रात सांगितले आहे. अभ्यंगस्नान म्हणजे पहाटे उठून डोक्याला आणि शरिराला तेल लावून नंतर कोमट पाण्याने स्नान करणे, शरीराला तेल लावून चोळून ते त्वचेत जिरविणे आणि नंतर ऊन (गरम) पाण्याने स्नान करणे म्हणजे अभ्यंगस्नान. पिंडाच्या अभ्युदयासाठी केलेले स्नान म्हणजेच अभ्यंगस्नान.




आकाशात तारे असतांना ब्राह्ममुहूर्तावर अभ्यंगस्नान करतात. आघाडा या वनस्पतीच्या फांदीने डोक्यापासून पायापर्यंत आणि पुन्हा डोक्यापर्यंत पाणी प्रोक्षण करतात. यासाठी मूळ असलेली आघाड्याची वनस्पती वापरतात. आघाडा वनस्पती उपलब्ध न झाल्यास देवाला प्रार्थना करून स्नान करावे. व्यक्तीला प्रथम कुंकवाचा टिळा लावण्यात येतो. तिच्या अंगाला शरिराच्या वरच्या भागाकडून खालच्या भागाकडे तेल लावण्यात येते. नंतर तेल आणि उटणे यांचे मिश्रण एकत्रित करून अंगाला लावण्यात येते. मग तिला ओवाळण्यात येते. त्यानंतर तिने दोन तांबे उष्ण पाणी अंगावर घेतल्यावर तिच्यावरून आघाडा किंवा टाकळा यांची फांदी मंत्र म्हणत तीनदा फिरवतात. अभ्यंगस्नासाठी उटणे उपलब्ध न झाल्यास त्याऐवजी खोबरेल तेलात हळद घालून ते अंगाला लावावे.

**अभ्यंगस्नानामुळे होणारे शारीरिक आणि आध्यात्मिक लाभ** - त्वचेला नेहमी स्निग्धता असावी लागते, म्हणून तेल लावतात. ऊन पाणी हे मंगल आणि शरीराला सुखदायक आहे; म्हणून ऊन पाण्याने स्नान करतात. तेल लावून नंतर स्नान करण्याने त्वचेला आणि केसांना आवश्यक तेवढाच ओशटपणा रहातो; म्हणून स्नानापूर्वी तेल लावणे आवश्यक आहे. स्नानानंतर तेल लावणे उचित नाही. स्नानामुळे रज-तम गुण एक लक्षांश इतके कमी होऊन सत्त्वगुण त्याच प्रमाणात वाढतात आणि त्यांचा प्रभाव नेहमीच्या स्नानामुळे सुमारे तीन तास टिकतो, तर अभ्यंगस्नानामुळे चार ते पाच तास टिकतो.

**यमतर्पण -** अभ्यंगस्नानानंतर अपमृत्यू निवारणार्थ यमतर्पण करण्यास सांगितले आहे. हा तर्पणाचा विधी पंचांगात दिलेला असतो. त्याप्रमाणे विधी करावा. त्यानंतर आई मुलांना ओवाळते. काही जण अभ्यंगस्नानानंतर नरकासुराच्या वधाचे प्रतीक म्हणून कारीट (एक प्रकारचे कडू फळ) पायाने ठेचून उडवतात, तर काही जण त्याचा रस (रक्त) जिभेला लावतात.

दुपारी ब्राह्मणभोजन घालतात आणि वस्त्रदान करतात. ब्राह्मणभोजन घालणे आणि वस्त्रदान करणे शक्य नसल्यास अर्पणाचा सदुपयोग होईल, अशा ठिकाणी किंवा धार्मिक कार्य करणाऱ्या संस्थांना काही रक्कम अर्पण करावी.

प्रदोषकाळी दीपदान करतात. ज्याने प्रदोषव्रत घेतले असेल, तो प्रदोषपूजा आणि शिवपूजा करतो.

**संदर्भ :**
**सनातन संस्थेचा ग्रंथ**
**'सण साजरे करण्याच्या पद्धती'**
**संपर्क : 9819242733**

# मानवतेचा दीप लावू!

आपण वर्षभर विविध सण साजरे करतो, त्यात दिवाळी सणाला विशेष महत्व आहे कारण दिवाळी हा असा एकमेव सण आहे जो आपण पाच दिवस साजरा करतो. आपल्या देशातच नाही तर संपूर्ण जगात दिवाळी उत्साहात साजरी केली जाते म्हणूनच दिवाळीला सणांचा राजा म्हणतात. दिवाळी सारखा उत्साह इतर कोणत्याच सणात नसतो. दिवाळीत लहानांपासून थोरांपर्यंत सर्वांच्याच उत्साहाला उधाण येते म्हणूनच गरीब असो वा श्रीमंत, राज महालात राहणारा राजा असो की झोपडीत राहणारा गोरगरीब प्रत्येक जण दिवाळी सण साजरा करतो. लहान मुलांसाठी तर दिवाळी म्हणजे पर्वणीच असते. शाळेला सुट्टी, नवे कपडे, नव्या वस्तू, किल्ला बनवणे, फटाके उडवणे, मिठाई, फराळ, मामाच्या गावाला जाणे अशा सर्व आवडत्या गोष्टी फक्त दिवाळीत करता येतात. दिवाळी म्हणजे लहान मुलांची चंगळ. केवळ लहान मुलेच नाही तर भावा - बहिणींचा देखील हा आवडता सण कारण दिवाळीतच भाऊबीज हा बहीण - भावांचा आवडता सण येतो. सासरी असलेली बहीण भावाला ओवाळण्यासाठी दिवाळीत आवर्जून माहेरी येते. दिवाळी हा आबालवृद्धांचा आवडता सण.

दिवाळी सण म्हणजे प्रकाशाचा सण, दिव्यांचा सण. दिवाळीच्या पाच दिवसांच्या काळात आकाशकंदील, पणत्या, रांगोळी, नवी खरेदी, नव्या वस्तू, नवे कपडे, फटाके यांची रेलचेल. आताही या वस्तू खरेदी करण्यासाठी बाजारपेठा फुलून गेल्या आहेत. २०२० आणि २०२१ या दोन वर्षात कोरोनाने जगभर धुमाकूळ घातला होता त्यामुळे या दोन वर्षात लोकांना मनासारखी दिवाळी साजरी करता आली नव्हती. मागील दोन वर्षापासून दिवाळीवरील कोरोनाचे सावट नाहीसे झाले मात्र कोरोनामुळे अनेकांचा रोजगार हिरावला गेला त्यामुळे अनेकांनी साधेपणाने दिवाळी साजरी केली. मागील दोन वर्षापासून दिवाळीवर कशाचेही सावट नसल्याने लोकांना दिवाळी मनासारखी साजरी केली. महागाई वाढली असली तरी दिवाळीचा उत्साह कमी झाला नाही उलट वाढतच गेला. दिवाळी हा आनंदाचा,



उत्साहाचा आणि प्रसन्नतेचा उत्सव असल्याने हा उत्साह यावर्षीही असाच कायम राहील असे वाटत होते मात्र ऐन दिवाळीच्या आधी झालेल्या अतिवृष्टीने या उत्साहावर पाणी पडले. राज्यातील शेतकऱ्यांवर आसमानी संकट आले. राज्यातील विविध भागात झालेल्या अतिवृष्टीने उभी पिके आडवी झाली. शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला घास हिरावला गेल्याने शेतकरी हवालदिल झाला. या संकटातून सावरण्याची ताकद शेतकऱ्यांना मिळो आणि त्यांची दिवाळी गोड व्हावी अशी प्रार्थना राज्यातील 13 कोटी जनता देवाजवळ करत आहे.

**श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**

**दिवाळी म्हणजे आनंदाचा दीपोत्सव.....!**

बाहेर प्रकाशाचे दिवे पेटवायचे आणि हृदयातून ज्ञानाचे दिवे प्रज्वलित करायचे. अंतःकरणात अज्ञानाचा, विषमतेचा, अहंकाराचा अंधार असेल तर तो दूर करायच. ज्या प्रमाणे आकाशकंदील, पणत्या लावून बाहेरील अंधार दूर करण्याचा संदेश दिवाळी देते तसेच आपल्या अंतःकरणात असलेल्या अवगुणांचा अंधार दूर करण्याचा संदेश दिवाळी देते. प्रत्येक मनुष्याने शुभ चिंतन करून, शुभ विचार मनात आणून, शुभ विचार प्रकट करून जीवन प्रगल्भ आणि समृद्ध करावे हाच संदेश दिवाळी देते.

जीवनातून आसुरी शक्तीचा पराभव करण्यासाठी दैवी शक्तीचा वापर करावा. मानवाची सर्व धडपड जीवनात सुख आणि आनंद मिळवण्यासाठीच चाललेली असते. दुःख भोगल्याशिवाय सुखाची किंमत कळत नाही हे तत्वज्ञान सांगण्यासाठी ठीक; मात्र दुःखाची अनुभूती घेण्यास कोणालाही आवडत नाही. मनुष्य स्वभावातील हा स्थायीभाव ओळखूनच भारतीय संस्कृतीत सणांची निर्मिती केलेली असावी याचे भान ठेवूनच प्रत्येकाने सण साजरे करावेत.

गरीब, कष्टी, दीन, दुबळे, वंचित असा मोठा दुःखी वर्ग समाजात आहे. आपल्या घरी दिवाळी साजरी करताना त्यांच्याही घरी आनंदाचा एक दिवा लावावा म्हणजे त्यांच्या चेहऱ्यावर देखील आनंदाची रेषा पसरेल. या दुःखी, कष्टी लोकांच्या चेहऱ्यावर हास्य पसरवणे हे आपल्या सर्वांचे कर्तव्यच आहे. साने गुरुजी म्हणतात त्याप्रमाणे बाहेर अनंत दिवे पाजळून दिवाळी येत नसते. हृदयात प्रेमाच्या, मानवतेच्या पणत्या लावून आनंदाची उधळण करणाऱ्या या सणातून आपल्या जीवनात प्रकाश आणू या! अशी दिवाळी साजरी झाली तरच खऱ्या अर्थाने दिवाळी साजरी झाली असे म्हणता येईल अन्यथा नाही!

चला तर मग दीन दुबळयांचे दुःख वाटून घेऊ, मानवतेचा ओलावा देऊ, त्यांच्या पाठीवर प्रेमाचा हात फिरवू, त्यांच्या जीवनात सौख्य निर्माण करू. आपल्या ताटातील खाणे याला प्रवृत्ती म्हणतात, दुसऱ्याच्या ताटातील ओरबाडणे याला विकृती म्हणतात तर आपल्या ताटातील दुसऱ्याला देणे याला संस्कृती म्हणतात. चला तर मग आपण या दिवाळीच्या निमित्ताने आपली संस्कृती जपण्याचा प्रयत्न करू. मानवतेचा दिप लावू!

# दिवाळी पहाटेत झंकारले कलावंतांचे सूर

## जिल्हा परिषद केंद्र शाळा राहनाळ येथे रंगला भक्तिमय सुरेल कार्यक्रम




दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : जिल्हा परिषद केंद्र शाळा राहनाळ येथे "सूरमयी दिवाळी पहाट" हा सुरेल आणि भक्तिमय कार्यक्रम अत्यंत उत्साहात पार पडला. कार्यक्रमाची सुरुवात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेच्या पूजनाने झाली. पूजनाचे मानकरी प्रभारी सरपंच प्रताप पाटील होते. सुरेल वातावरण निर्मिती करत दिप्ती माळी यांनी 'ओंकार प्रधान' या गीताने कार्यक्रमाची सुरुवात केली. त्यानंतर एकापाठोपाठ एक दर्जेदार गायन-वादन सादरीकरणांनी उपस्थितांची मने जिंकली.

या कार्यक्रमात तुकाराम मढवी, संजय अस्वले, कुमार पाटील, दिप्ती माळी, शरद जाधव, गोरखनाथ देसाई, गणेश कदम, रविंद्र बाळे, सुरेश जाधव आणि लक्षित तरे या कलावंतांनी आपल्या सुरेल सादरीकरणातून दिवाळीच्या उत्सवाला रंगत आणली. त्यामध्ये दिप्ती माळी यांनी 'उगवला तारा तिमिर हरा गर्जा शिवाजी राजा' जेव्हा निघाली मर्दानी शिवरायांची तलवार तुकाराम मढवी यांनी जोशपूर्ण गीते सादर करून उपस्थितांना इतिहासाच्या अभिमानाने भारावून टाकले. संजय अस्वले यांनी 'गोकूळीच्या सुखा अंत नाही रेखा' 'विठ्ठल विठ्ठल गजरी गजरी दुमदुमली पंढरी' ही भक्तिमय गाणी सादर केली.

तुकाराम मढवी यांनी 'पाषाणाचे टाळ पाषाणाचा देव' आणि 'जय महाराष्ट्र माझा', गोरखनाथ देसाई यांनी 'दसरा दिवाळी तोची आम्हा सण', लक्षित तरे यांनी 'माझा देव पंढरी पंढरी', कुमार पाटील यांनी 'अमृताची गोडी लागली अभंगा', तर शरद जाधव यांनी 'आनंददाची दिवाळी गोविंद गोविंद' हे गीत सादर करून वातावरणात आनंद, भक्ती आणि उत्साहाची लहर निर्माण केली. वादन विभागातही कलाकारांनी उत्कृष्ट सादरीकरण केले. तबला वादन सुरेश जाधव आणि संजय अस्वले यांनी केले, हार्मोनियम साथ लक्षित तरे यांनी केली, तर बासरी वादन रविंद्र बाळे यांनी सादर करून वातावरण मंत्रमुग्ध केले.

कार्यक्रमाच्या ठिकाणी रांगोळया, आकाशकंदील आणि दिव्यांच्या प्रकाशाने सजवलेले वातावरण सर्वांच्या मनाला भावले. संपूर्ण परिसर भक्तीभाव, संगीत आणि दिवाळीच्या प्रकाशाने उजळून निघाला. राहनाळ शाळेत दिवाळी पहाट आयोजित करण्याचे हे सलग चौथे वर्ष असून हा उपक्रम गावाच्या सांस्कृतिक जडणघडीत मोलाची भर घालत आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाळेचे मुख्याध्यापक अजय पाटील यांनी केले, तर आभार प्रदर्शन राजश्री पाटील यांनी करून कार्यक्रमाची सांगता केली.

# माजी नगरसेवक पुरुषोत्तम चव्हाण यांना जीवे मारण्याची धमकी

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : कल्याण मधील वालधुनी परिसरात कुख्यात गुंड फिरोज खान उर्फ फिरोज मेंटल आणि त्याचा साथीदार तौसिफ सय्यद यांची वालधुनी परिसरात दहशत असून या गुंडगिरीविरोधात तक्रार केल्याने शिवसेना ठाकरे गटाचे माजी नगरसेवक पुरुषोत्तम चव्हाण यांना जीवेठार मारण्याची धमकी देण्यात आली आहे.

यासंदर्भात माजी नगरसेवक चव्हाण यांनी महात्मा फुले पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. फिरोज मेंटल हा पूर्वीपासूनच



गुन्हेगारी विश्वातील ओळखलेले नाव असून, त्याच्यावर बलात्कार, अपहरण, खंडणी, हत्या अशा अनेक गंभीर गुन्ह्यांचे गुन्हे दाखल आहेत. तरीही तो आणि त्याचे साथीदार मुक्तपणे फिरत असल्याने नागरिकांमध्ये संतापाची लाट आहे. या घटनेनंतर महात्मा फुले पोलीस ठाण्याचे पथक सक्रिय झाले असून, फिरोज मेंटल आणि तौसीफ सय्यद यांच्या शोधासाठी पोलीसांनी जोरदार मोहीम सुरू केली आहे. दरम्यान, स्थानिक नागरिकांनी या दोघांच्या अटकेची मागणी करत पोलिस प्रशासनाने तातडीने कारवाई करावी, अशी मागणी केली आहे. परिसरात पुन्हा शांतता प्रस्थापित व्हावी, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे.

# कल्याणातील सामाजिक व्यक्तीमत्व डॉ. सुरेश एकलहरे यांचे निधन

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : कल्याण शहरातील ज्येष्ठ सामाजिक व्यक्तीमत्व आणि समाजाभिमुख डॉक्टर अशी ओळख असलेले डॉ. सुरेश एकलहरे यांचे शनिवारी सायंकाळी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या निधनाने वैद्यकीय तसेच सामाजिक क्षेत्रात हळहळ व्यक्त होत आहे.

डॉ. एकलहरे यांनी अनेक वर्षे कल्याण शहरात रुग्णसेवा, गरीब आणि वंचित घटकांच्या आरोग्यसेवेसाठी आपले आयुष्य अर्पण केले. केवळ वैद्य म्हणून नव्हे तर सामाजिक जाण असलेले कार्यकर्ते म्हणून त्यांची



ओळख होती. ते कल्याणमधील शुक्ल यजुर्वेदी माध्यंदिन ब्राह्मण संस्था, याज्ञवल्क्य संस्था, सोशल सर्व्हिस लीग, कल्याण संस्कृती मंच, सदिच्छा अपंग पुनर्वसन केंद्र, डॉ. आनंदीबाई जोशी लोक विद्यालय आणि बालकल्याण संस्था अशा विविध संस्थांमध्ये सक्रियपणे सहभागी होते.

सामाजिक कार्यातील त्यांच्या सातत्यपूर्ण योगदानाबद्दल सार्वजनिक गणेशोत्सव सुभेदार वाडा समितीकडून त्यांना "मानाचा शताब्दी पुरस्कार"ही देण्यात आला होता. त्यांच्या साधेपणामुळे आणि लोकाभिमुख स्वभावामुळे कल्याणकारांच्या मनामध्ये त्यांचे आदराचे स्थान होते. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा आणि मुलगी असा परिवार असून, एकलहरे यांच्या निधनाने कल्याण शहरातील सामाजिक आणि वैद्यकीय क्षेत्राने एक संवेदनशील व्यक्तिमत्त्व गमावल्याची हळहळ व्यक्त होत आहे.

जीवनदीप महाविद्यालय गोवेली ता. कल्याण
मुंबई विद्यापीठाशी संलग्न, नॅक मूल्यांकन प्राप्त
प्रवेश सुरू (२०२५•२६)
पदवी नंतर पत्रकारितेत करिअर करण्याची सुवर्णसंधी
एम.ए (एमसीजे)
(मास्टर ऑफ जर्नालिझम अँड मास कम्युनिकेशन)
-पात्रता-
कोणत्या शाखेतून पदवी उत्तीर्ण
- करिअर व्यवसाय व नोकरीची संधी -
टीव्ही चॅनेल्स, वृत्तपत्र, मॅक्झिन, रेडिओ, वेब मीडिया, जनसंपर्क, जाहिरात, चित्रपट निर्मिती, डिजिटल मीडिया या क्षेत्रांमध्ये संधी .
- प्रवेशासाठी संपर्क -
९४२१०५९३९६
goveli_jssp@rediffmail.com
www.jeevandeepcollegegoveli.in




**मेष**
भावा-बहिणींसोबत कोणत्याही मुद्द्यावरून वाद झाला असेल तर तोही सोडवला जाईल. कुटुंबाला वेळ दिल्याने घरातील वातावरण प्रसन्न राहील.

**वृषभ**
तुमच्या वागण्यातून लोकांमध्ये समन्वय राखाल. जवळच्या मित्राचा सल्ला उपयुक्त ठरेल. आपण कुटुंबासोबत घरी चित्रपट पाहण्याचा बेत करू.

**मिथुन**
तुम्ही त्यांना समजून घेण्याचा प्रयत्न करा.ऑफिसमध्ये वरिष्ठांचे सहकार्य मिळेल आणि बिघडलेली कामेही पूर्ण होतील. काही नवीन कल्पनांवरही काम कराल.

**कर्क**
तुमचे मत कुटुंबासमोर मांडण्याची पूर्ण संधी मिळेल, लोक तुमच्या योजनेने खूप प्रभावित होतील. काळ अनुकूल आहे, परंतु तुम्हाला कृतीशील राहावे लागेल.

**सिंह**
सरकारी नोकरी करणाऱ्यांना अतिरिक्त जबाबदारी मिळू शकते. अधिकाऱ्यांचाही दबाव असेल.तुम्ही एखाद्या कार्यक्रमात जाण्याचा विचार करू शकता.

**कन्या**
आरोग्याच्या दृष्टीने तुम्हाला निरोगी वाटेल. तुम्ही काही विशेष कामासाठी प्रयत्न करत असाल तर तुम्हाला यश मिळू शकते.दिवस चांगला असेल.

**तूळ**
मुलांकडून आनंदाची बातमी मिळेल, घरातील सर्वजण आनंदी होतील. विरोधी पक्ष तुमच्यापुढे झुकेल आणि तुमचे सोशल नेटवर्क मजबूत होईल.

**वृश्चिक**
तुम्ही आज मालमत्ता खरेदी-विक्रीचे नियोजन केले असेल तर ते पूर्ण होऊ शकते. आज कुटुंबात सुसंवाद राहील. तुमची आर्थिक बाजू मजबूत राहील.

**धनु**
कुटुंबात सुरू असलेली भांडणे बाहेरील कोणाच्याही लक्षात येऊ देऊ नका. वडिलांचा आशीर्वाद तुमच्या पाठीशी राहील.कामाच्या क्षमतेत बदल होईल.

**मकर**
बालपणीचा जुना मित्र भेटेल, ज्याला भेटून आनंद होईल.मोठे आणि वेगळे काम करण्याचा विचार करू शकता. मुलांशी वाद होण्याची शक्यता आहे.

**कुंभ**
आज तुमच्या दिनचर्येत काही बदल होईल. आज तुम्ही जोखीम घेण्यापासून मागे हटणार नाही. असे केल्याने तुम्हाला फायदा देखील होऊ शकतो.

**मीन**
विद्यार्थी त्यांच्या गंतव्यस्थानापर्यंत पोहोचण्यात यशस्वी होतील. सामाजिक क्षेत्राशी संबंधित आहात, तुमचा सन्मान होईल. डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.

नियमित वाचा दै. ठाणे जीवनदीप वार्ता

# जाणता राजा युवा प्रतिष्ठानच्या वतीने शिवबाचा जागर





दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : डोंबिवली पश्चिम येथील गावदेवी मंदिर मैदानात जाणता राजा युवा प्रतिष्ठानच्या वतीने 'जागर शिवबाच्या नावानं' या सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी भारतीय जनता पार्टीचे प्रदेशाध्यक्ष तथा आमदार रविंद्र चव्हाण यांनी कार्यक्रमाला उपस्थित राहून छत्रपती शिवाजी महाराजांच्या अद्वितीय कार्याचा नाट्यानुभव विविध सादरीकरणाद्वारे घेतला. यावेळी शिवराज्याभिषेक नाट्य, गडकिल्ल्यांचे दृश्यरूप प्रदर्शन, शाहीरी लोककला, ढोल–ताशा पथकाकडून मानवंदना तसेच मल्लखांब प्रात्यक्षिक, लाठी–काठी प्रात्यक्षिकांसारख्या चित्तथरारक कसरतींचेही सादरीकरण करण्यात आले. यावेळी संपूर्ण वातावरण शिवमय झाले होते. याप्रसंगी शिवभक्त तरुणाईचा उत्साह वाखाणण्याजोगा होता.

# वाचन प्रेरणा दिनानिमित्त केडीएमसी शाळांमध्ये विविध कार्यक्रम




दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : शासनाच्या निर्देशानुसार भारताचे माजी राष्ट्रपती डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या स्मृती जतन करण्याचे उद्देशाने त्यांचा जन्म दिवस हा "वाचन प्रेरणा दिन" म्हणून साजरा करण्यात येतो. या अनुषंगाने शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची प्रेरणा निर्माण करण्यासाठी व वाचनाची आवड वृध्दीगत करण्यासाठी कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या शिक्षण विभागाचे प्रशासन अधिकारी भारत बोरनारे व शिक्षणाधिकारी विजय सरकटे यांच्या मार्गदर्शनाखाली महापालिका परिक्षेत्रातील अनेक शाळा व महाविद्यालयांमध्ये वाचन प्रेरणा दिनानिमित्त अनेक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

महापालिका क्षेत्रातील शाळा व महाविद्यालयात ए.व्ही.च्या माध्यमातून डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या जीवन कार्याची माहिती शालेय विद्यार्थ्यांना देण्यात आली असून, प्रेरणादायी पुस्तक वाचन कार्यक्रम करण्यात आले. यामध्ये कल्याण मधील शारदा हायस्कुलमध्ये ग्रंथ प्रदर्शनाचे अनोखे कार्यक्रम केले होते. तर डोंबिवलीतील प्रगती कला व वाणिज्य विद्यालयामध्ये डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या पुस्तकांचे प्रदर्शन घडवून, "वाचन प्रेरणा दिन" साजरा करण्यात आला. महानगरपालिका शाळांमधील विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी, याकरीता "एक तास वाचनाचा उपक्रम" घेण्यात आला. त्याचप्रमाणे शालेय विद्यार्थ्यांमध्ये निबंध स्पर्धा, चित्रकला स्पर्धा व रांगोळी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. त्याचप्रमाणे विज्ञान व तंत्रज्ञान विषयक योगदान, आपले मिसाईल मॅन इ. विषयांवर विविध शाळांमध्ये व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.

# शेतकऱ्यांना मिळणाऱ्या तूटपुंजी मदतीचा निषेध

## राष्ट्रवादी शरद पवार गट आक्रमक

## पेण शहरातील रस्ते व दुकानात भीक मांगो आंदोलन



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**पेण** : राज्यातील शेतकऱ्यांना राज्य सरकारने तूटपुंजी मदत तीही दिवाळी सणात न मिळाल्याने सरकारचा निषेध म्हणून राष्ट्रवादी काँग्रेसचे शरद पवार गटाचे रायगड जिल्हा अध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली जिल्ह्यातील तालुका अध्यक्ष, महिला आघाडीच्या पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी आज पेण शहरात रस्त्यावर व दुकानात जाऊन भीक मागत अनोखं आंदोलन छेडले. या आंदोलनाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला आज पेण येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्याला पुष्पहार प्रदान करुन या आंदोलनाची सुरुवात झाली. ऐन दिवाळी सणात रस्त्यावर गर्दी असताना हे आंदोलन छेडले आणि तो औत्सुक्याचा विषय ठरला. शेतकरी बांधवाचे पावसामुळे दिवाळं निघलय याचं सरकारला सोयरसुतक नाही. कष्टकरी अन्नदाता शेतकरी संकटात असताना मदतीच्या नावाखाली शेतकऱ्यांच्या तोंडाला पाने पुसण्याचे काम सरकारने केले आहे. लाडक्या बहिणीना द्यायला पैसे आहेत मात्र अन्नदाता शेतकरी राजा भिकेला लागला असताना तिजोरीत खणखणाट आहे असे अर्थमंत्री म्हणतात . ज्या शेतकऱ्यांनी कोरोना साथीत देशाची अर्थव्यवस्था आपल्या कष्टाने सावरली तो शेतकरी निसर्गाच्या कोपात अतिवृष्टीमुळे हतबल झाला. खायला अन्न नाही शेती वाया गेली यासाठी भिक मागत जमा केलेला पैसा मुख्यमंत्री सहाय्यता निधी मध्ये जमा करणार आणि शेतकऱ्यांना मदतीचा हात देणार यासाठी सरकारचा निषेध म्हणून हे अनोखे भीक मांगो आंदोलन पेण शहरातील मुख्य रस्त्यावर व दुकानात जाऊन भीक घेतल्याचे जिल्हा अध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी प्रसार माध्यमांशी बोलताना सांगितले.यानंतर पेण पोलीस ठाण्यात निवेदन देण्यात आले. या आंदोलनात सहभागी झालेल्या मान्यवरांमध्ये महाड तालुका अध्यक्ष संदीप सकपाळ,रोहा तालुका अध्यक्ष तुषार खरीवले, माणगाव महिला आघाडीच्या प्राजक्ता जाधव कर्जत तालुका अध्यक्ष ॲड.भाऊसाहेब मोरे , उपाध्यक्ष राम देशमुख, महाड महिला आघाडीच्या अश्विनी महाडीक पेण तालुका अध्यक्ष प्रकाश मोकल महाड शहर अध्यक्ष पराग वडके माणगाव शहर अध्यक्ष राजू रोटेकर आणि पेण मधील पक्ष कार्यकर्ते आंदोलनात सहभागी झाले होते..

# शस्त्र परवाना धोरण उद्दिष्टपूर्तीला हरताळ

## सर्वच शस्त्र परवाने रद्द व्हावेत

निलेश घायवळ प्रकरणाने महाराष्ट्रातील शस्त्र परवाना धोरण पुन्हा एकदा चर्चेच्या केंद्रस्थानी आणले आहे. गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या व्यक्तीकडे शस्त्र परवाना असणे किंवा शेकडो गुन्हे नोंद असलेल्या व्यक्तीला पासपोर्ट मिळणे ही केवळ एक प्रशासनिक त्रुटी नाही, तर कायद्याच्या अंमलबजावणीतील गंभीर दुष्परिणामांचे निदर्शक आहे. प्रश्न एका व्यक्तीपुरता मर्यादित नाही; हा राज्याच्या कायदा-सुव्यवस्थेचा आणि प्रशासनाच्या कार्यक्षमतेचा आरसा ठरतो आहे.

राज्य सरकारने "स्वसंरक्षण" या उद्देशाने शस्त्र परवाने देण्याची योजना राबविली. या धोरणामागील उद्देश हा नागरिकांना आपत्कालीन परिस्थितीत स्वतःचे रक्षण करण्याची परवानगी मिळावी, दहशतवाद, गुन्हेगारी किंवा सामाजिक अस्थिरतेच्या प्रसंगी काही प्रमाणात नागरिक सक्षम राहावेत, आणि कायदा-सुव्यवस्थेला पूरक असा सामाजिक आत्मविश्वास वाढवावा.

उद्देश स्तुत्य आहे, कारण तो नागरिकांच्या सुरक्षेशी निगडित आहे. परंतु, याच धोरणाचा मोठ्या प्रमाणावर गैरवापर आणि विकृतीकरण झाल्याचे अनेक उदाहरणे अधोरेखित करतात. शस्त्र परवाना धोरण हे नागरिकांच्या सुरक्षेसाठी असावे, सत्तेच्या प्रातिनिधिक प्रदर्शनासाठी नव्हे. राज्य सरकारने या विषयाकडे गंभीरतेने पाहून "स्वसंरक्षण" या पवित्र उद्देशाला न्याय मिळवून द्यावा. कारण प्रत्येक चुकीच्या परवान्याच्या मागे फक्त प्रशासनिक त्रुटी नसते तर ती कायद्याच्या अधिष्ठानावरचा विश्वास डळमळवणारी गोष्ट असते.

उद्दिष्टपूर्तीला हरताळ हा आपल्या राजकीय प्रशासकीय व्यवस्थेचे व्यवच्छेदक लक्षण झालेले आहे याचे मूर्तिमंत उदाहरण म्हणजे शस्त्र परवाना योजना. राज्यातील प्रत्यक्ष परिस्थिती पाहता शस्त्र परवाना योजना "स्वसंरक्षणा" पेक्षा सामाजिक प्रतिष्ठा, दडपशाही, शस्त्राचा धाक दाखवत गुंडगिरी आणि स्थानिक सत्तेचे प्रदर्शन यासाठी वापरली जात असल्याचे स्पष्ट होते.

"राज्यात ज्या नागरिकांकडून अन्यांच्या जीवाला धोका संभवतो अशाच ९०% लोकांकडे शस्त्र परवाने आहेत" हे विधान अतिशयोक्ती वाटेल, पण जमिनीवरील वास्तव तेच दर्शवते. अनेक प्रकरणांत राजकीय कार्यकर्ते, नेत्यांचे नातेवाईक आणि प्रभावशाली लोक हेच परवानाधारक असल्याचे समोर आले आहे. तर खरोखर जीवाला धोका असणारे पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते, अथवा व्हिसलब्लोअर्स यांना मात्र परवाना मिळवण्यासाठी अनेक वर्षे प्रतिक्षा करावी लागते.

खरे तर राज्य सरकारने नागरिकांना शस्त्र देऊन त्यांचे संरक्षण करण्याचा परवाना देण्यापेक्षा पोलीस यंत्रणेला इतके सक्षम बनवावे की नागरिकाला शस्त्राची गरजच भासू नये. पण राज्य सरकार सोपा मार्ग निवडताना दिसते आहे.

**धोरणाच्या अधःपतनामुळे उद्दिष्टपूर्तीला हरताळ :**

आज शस्त्र परवाना ही सामाजिक शक्तीची ओळख बनली आहे. अनेक ठिकाणी हे शस्त्र 'कमरेवरील सजावट' म्हणून वापरले जाते ते सामाजिक धाक निर्माण करण्यासाठी, विरोधकांना गप्प करण्यासाठी, आपल्या गैरकृत्यांविरोधात आवाज उठवणाऱ्यांचा आवाज बंद करण्यासाठी आणि गुंडगिरीला अधिकृत संरक्षण मिळवण्यासाठी.

१८ वर्षे पूर्ण केलेल्या लोकप्रतिनिधींच्या मुलाच्या कमरेवर "स्वसंरक्षणार्थ" परवाना असलेले शस्त्र दिसते, तेव्हा धोरणाचे अधःपतन किती खोलवर गेले आहे हे स्पष्ट होते. राजकीय हस्तक्षेपामुळे परवाना प्रक्रियेत पारदर्शकता हरवली असून, शस्त्र परवाना यंत्रणा "सामाजिक सन्मानाची परवानगी" बनली आहे, स्वसंरक्षणाचे साधन नव्हे.

शस्त्र परवाना धारकांची पुनर्पडताळणी काळाची गरज राज्य सरकारने पुढील मुद्यांवर तातडीने सखोल अभ्यास करावा. परवाना धारकांपैकी किती लोकांनी खरोखर शस्त्राचा वापर "स्वसंरक्षणासाठी" केला आहे? किती जणांना शस्त्र चालवण्याचे प्रशिक्षण प्रत्यक्ष दिले आहे? किती परवाने "राजकीय शिफारसींवर" मंजूर झाले? आणि किती परवाने गैरप्रकाराने प्राप्त झाले आहेत?

तसेच, परवाना धारकांची यादी सार्वजनिक डोमेनवर प्रकाशित करण्याची आवश्यकता आहे. जनतेला हे माहीत असले पाहिजे की "कोणत्या समाजसेवकांच्या जीवाला प्रत्यक्ष धोका आहे". यामुळे पारदर्शकता वाढेल आणि नागरिकांचा प्रशासनावर विश्वास परत मिळेल.

वाढत्या शस्त्र परवान्यांमुळे पोलिसांच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्हे :

ज्या राज्यात नागरिक मोठ्या प्रमाणावर शस्त्र परवाने घेतात, त्या राज्यातील पोलीस यंत्रणेच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण होते. शस्त्र परवाने हे नागरिकांच्या भीतीचे प्रतिबिंब बनू नयेत. तर राज्याच्या कायदा-सुव्यवस्थेवरील नागरिकांचा विश्वास हा खरा सुरक्षा कवच असावा.

**आवश्यक उपाययोजना अशा :**

शस्त्र परवाना धोरणाचा उद्देश जरी उदात्त असला, तरी त्याची अंमलबजावणी अत्यंत दुरुपयोगग्रस्त आणि दिशाहीन झाली आहे. त्यामुळे पुढील पावले अत्यावश्यक आहेत :

- सर्व परवाना धारकांची पडताळणी करून गैरमार्गाने मिळालेले परवाने तातडीने रद्द करणे.
- उच्चस्तरीय समिती स्थापन करून धोरणाचा नव्याने अभ्यास करणे.
- परवाना मंजुरी प्रक्रिया पूर्णपणे पारदर्शक करणे. पोलीस यंत्रणेला अधिक सक्षम बनवणे, जेणेकरून नागरिकांना स्वसंरक्षणासाठी शस्त्रावर अवलंबून राहावे लागू नये.
- कायद्यासमोर सर्व समान या तत्वाला न्याय देण्यासाठी एकतर राज्यातील प्रत्येक नागरिकाला शस्त्र परवाना द्यावा किंवा राज्यातील सर्व शस्त्र परवाने रद्द करावेत.

ज्या ज्या व्यक्तींना राज्य सरकारने शस्त्र परवाना दिलेला आहे, त्या व्यक्तीचे असे कोणते कर्तव्य आहे की ज्याच्या मुळे त्याच्या जीविताला धोका निर्माण झालेला आहे. शस्त्र परवान्याची मागणी करणाऱ्या व्यक्तीचे कोणते सामाजिक कर्तृत्व आहे की ज्या योगे त्याला स्वसंरक्षणासाठी शस्त्र परवाना घेण्याची वेळ आलेली आहे. याचा संपूर्ण लेखाजोखा जनतेसमोर खुला करावा.

**लेखक :**
**सुधीर लक्ष्मीकांत दाणी**
**सामाजिक विषयांचे अभ्यासक व जनहित विषयांवरील सखोल विश्लेषक आहेत**
संपर्क : ९८६९२२६२७२
danisudhir1810@gmial.com

# समाज कल्याण न्यासकडून भाऊबीजेची भेट

## ठाणे – पालघर जिल्ह्यात पाच हजार महिलांना साडी वाटप !



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**शहापूर ग्रामीण :** दरवर्षीप्रमाणे यावर्षीही समाज कल्याण न्यास या संस्थेच्या माध्यमातून गोरगरीब महिलांना साडी, मिठाई व विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करुन दिवाळी भाऊबीज भेट हा उपक्रम हाती घेण्यात आला आहे.

ठाणे -पालघर जिल्ह्यातील विविध ग्रामीण भागात हा उपक्रम सुरू असून समाज कल्याण न्यासचे संस्थापक अध्यक्ष सोन्या पाटील यांच्या माध्यमातून व सर्व पदाधिकारी, सदस्य यांच्या परिश्रमातून हा उपक्रम राबविण्यात येत आहे तसेच इतर सामाजिक व राजकीय संघटनाच्या वतीने आयोजित कार्यक्रमातही समाज कल्याण न्यासच्या सहकार्याने महिलांना साडी, मिठाई व विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य आदी भेट वस्तूचे वाटप केले जात असल्याचे संस्थापक अध्यक्ष सोन्या पाटील यांनी म्हटले आहे.

दरम्यान, दिवाळी भाऊबीज भेट हा उपक्रम सुरू असून या उपक्रमाला उद्योजक अशोक अग्रवाल यांज कडून मिठाई उपलब्ध झाली आहे. तर गेल्या वीस -बावीस वर्षांपासून गोरगरिबांसाठी मदत, विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक साहित्य वाटप असे अनेक स्तुत्य उपक्रम संस्थेच्या माध्यमातून सुरू असून संस्था माध्यमातून भिवंडी मॅरेथान स्पर्धा, आरोग्य शिबीर महिलांना व्यवसाय प्रशिक्षण, विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप असे विविध उपक्रम हाती घेतले जात आहेत. तसेच दिपावली निमित्त दरवर्षी महिला भगिनींना साडी व विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप केले जात असल्याचे सोन्या पाटील यांनी सांगितले.

# पडघा सांस्कृतिक मंचच्या वतीने "दिवाळी पहाट" कार्यक्रम

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**पडघा** : वाढत्या नागरीकरणामुळे चर्चेत असलेल्या भिवंडी तालुक्यातील पडघा येथे दिवाळी सणानिमित्त "पडघा सांस्कृतिक मंचच्या " वतीने "दिवाळी पहाट" कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

पडघा सांस्कृतिक मंच यांच्या वतीने "दिवाळी पहाट" कार्यक्रमाचे आयोजन २२ ऑक्टोबंर रोजी रुचीरा हॉटेलच्या बाजुला बाजारपेठ पडघा येथे सकाळी ६ ते ९ या वेळेत करण्यात आले असुन त्यामध्ये सुप्रसिध्द भजन सम्राट ह. भ. प. वैभव मंडलिक हे भक्तीगीत व भावगीते सादर करणार असुन, मंचच्या वतीने भव्य रांगोळी व किल्ला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. त्यात २१ ऑक्टोबर रोजी पर्यावरणावर आधारीत रांगोळी स्पर्धा जिल्हा परिषद शाळा येथे आयोजीत करण्यात आली असुन प्रथम क्रमांक विजेत्याला पैठणी साडी बक्षीस देण्यात येणार आहे. तसेच "किल्ला बनवा" स्पर्धेचेही आयोजन करण्यात आले आहे. स्पर्धकांनी २० ऑक्टोबंर पर्यंत नावे मंडळाकडे नोंदवावीत असे आवाहन आयोजकांतर्फे करण्यात आले असुन विजेत्या स्पर्धकांना बक्षीस, पारितोषिके "दिवाळी पहाट" कार्यक्रम स्थळी देण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले. असुन जास्तीत जास्त स्पर्धकांनी सहभाग घ्यावा असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# महिलांचा सन्मान ही शिवसेनेची परंपरा - मोहन उगले

## काळा तलाव परिसरात घरेलू कामगार महिलांना दिवाळी निमित्त फराळ, साडी वाटप



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पदस्पर्शाने पावन झालेली कल्याण ही ऐतिहासिक नगरी असून शिवाजी महाराजांनी साडी चोळी देऊन येथील सुभेदाराच्या सुनेचा सन्मान केल्याचा इतिहास आहे. हाच आदर्श डोळयासमोर ठेऊन शिवसेना प्रत्येक महिलेचा सन्मान करणे ही शिवसेनेची परंपरा असल्याचे मत शिवसेना उपशहर प्रमुख तथा माजी नगरसेवक मोहन उगले यांनी व्यक्त केले. प्रभाग क्रमांक २८ काळा तलाव येथील गणेश नगर, नवनाथकृपा चाळ, खंडेलवाल कॉलनी, सुर्वे चाळ, ढगे कॉलनी, रामनगर परिसरामध्ये शिवसेना ठाणकर पाडा विभागीय शाखेतर्फे मोहन उगले यांच्यातर्फे घरेलू कामगार महिलांना दिवाळीनिमित्त फराळ,साडी वाटप करण्यात आले यावेळी ते बोलत होते.

त्याप्रसंगी शिवसेना महिला कल्याण शहर संघटक नेत्रा उगले, विभाग प्रमुख अनंत पगार, उपविभाग प्रमुख दिगंबर ठाणगे, शाखा संघटक ज्योती पाटील यांच्या उपस्थितीत परिसरातील घरेलू कामगार महिलांना दिवाळीनिमित्त फराळ आणि साडी वाटप करण्यात आले. यावेळी शिवसेना पदाधिकारी, शिवसैनिक, युवासैनिक, महिला आघाडी तसेच परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. शिवसेना नेहमी सर्वसामान्य नागरिकांच्या सोबत असल्याची ग्वाही यावेळी उगले यांनी उपस्थितांना देत कोणतीही समस्या असुद्या शिवसेना शाखेत त्या समस्येचे निराकरण होत असल्याचे त्यांनी सांगितले.



ठाणे ◆सोमवार
२० ऑक्टोबर २०२५
दैनिक ठाणे
जीवनदीप वार्ता
पान ४

# दादर सागरी पोलिसांचा गावठी हातभट्टीवर छापा हजारोंचा माल जप्त

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**पेण** : पेण तालुका हद्दीतील दादर सागरी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संजयकुमार ब्राह्मणे यांच्या मार्गदर्शनाखाली रावे गावातील हद्दीत खाडी किनारी पूर्वेस कांदळवन जंगल भागात अवैद्य गावठी हातभट्टी दारू चा व्यवसाय चालत असल्याची बातमी मिळाल्याने दादर सागरी पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक एकनाथ सकपाळ, सहाय्यक फौजदार संदेश ठाकूर, पोलीस हवालदार अतीश पाटील, पोलीस हवालदार नंदन पाटील, पोलीस हवालदार नितीश पाटील, पोलीस हवालदार योगेश म्हात्रे, पोलीस शिपाई मयूर पाटील, पोलीस शिपाई ऋषिकेश आगम असे पथक नेमून सोबत दोन पंच असे अवैध धंद्यावर धाड टाकणे कामी रावे येथे गेले असता. सदर ठिकाणी गावठी हातभट्टी दारू बनविण्याचे एकूण 83,500 रुपये किमतीचे रसायन व साहित्य मिळून आले. सदरचे साहित्य हे अवजड असल्याने जागीच नष्ट करण्यात आले असून, त्याच्या सविस्तर पंचनामा करण्यात आला आहे.आरोपी याचे विरुद्ध पोलीस शिपाई ऋषिकेश आगम, यांनी सरकारतर्फे फिर्याद दिली त्यावरून दादर सागरी पोलीस स्टेशन गुन्हा रजिस्टर नंबर 67/2025 महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम 1949 चे 65 खंड क, व खंड फ प्रमाणे वाजता दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस निरीक्षक संजयकुमार ब्राह्मणे यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार नितीश पाटील, दादर सागरी पोलीस ठाणे हे करीत आहेत.

### फॅन्सी व चाइनामेड पणतीला बाजारात मागणी वाढल्याने

# भिवंडीत मातीच्या पणत्यांच्या विक्रीमध्ये घट

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी** : दिवाळी सणाला मोठ्या उत्साहामध्ये सुरुवात झाली असून बाजारपेठेमध्ये कंदील, विद्युत माळा त्याचबरोबर भिवंडीत स्वस्त दरात असलेल्या फॅन्सी व चायनामेड रंगीत पणतीची विक्री मोठ्या प्रमाणात वाढल्यान कुंभार समाज बांधवांच्यावतीने पारंपरिक मातीच्या सहाय्याने तयार करण्यात आलेल्या साध्या पणतीच्या विक्रीस फटका बसला आहे. मातीच्या पणत्या बाजारातून कमी होत असल्याने परंपरागत कुंभार व्यवसाय करणाऱ्या समाज बांधवांच्या रोजगाराचा प्रश्न निर्माण झाला असल्याने चिंता व्यक्त केली जात आहे.



गेल्या पाच महिन्यापासून पाऊस झाल्याने सर्व हिंदू परंपरांच्या सणांवर परिणाम झाला. लोकांमधील उत्साह कमी झाला.पावसामुळे अनेक भाविकांनी हौसमौज न करता केवळ सणांच्या रितिरिवाज पाळत सण उरकत घेतले. त्याचा फटका स्थानिक बाजारपेठेवर झाला.मात्र दिवाळीच्या सणांमध्ये पावसाने विश्रांती घेतल्याने नागरिकांमध्ये उत्साह दुपटीने संचारल्याने भिवंडी शहर व ग्रामीण भागातील बाजारपेठा फुललेल्या दिसत आहेत.दरम्यान गुरुवारी अचानक पावसाने अचानक हजेरी लावल्याने बाजारपेठेत असलेल्या हातगाडी व्यवसायीक व फेरीवाल्यांचे नुकसान झाले. त्याचप्रमाणे मातीच्या पणत्या आणि मडकी भिजली. दिवाळी असल्याने सध्या बाजारात सर्वच वस्तूंना महत्व आल्याने मातीच्या साध्या पणत्या पेक्षा नक्षीदार पणत्या,रंगविलेल्या फॅन्सी पणत्या यांचा खप वाढला आहे. त्याच बरोबर चायना मेड मेणाच्या व पाण्याने पेटणाऱ्या पणत्यांना मागणी वाढली आहे.पूर्वी भिवंडीत मोठी घरे,वाडा,बैठी घर, चाळ, आणि यंत्रमाग कारखाने देखील मातीच्या पणत्यांनी उजळून निघत होते. त्यामुळे चार ते पाच लॉरी भरून आणलेल्या पणत्यांचा माल विक्री होत होता. मात्र महागाई आणि सणांचे निमित्तमात्र म्हणून पणत्यांची मागणी देखील नवीन काळाच्या ओघात कमी झाल्याने कुंभार व्यवसायावर परिणाम होऊ लागला असल्याची खंत विशाल कुंभार समाज बांधवांने व्यक्त केली. बाजारपेठेच्या परिणामामुळे कुंभारकाम करणारे देखील कमी झाल्याने भविष्यात मातीच्या पणत्या लोप पाऊन रेडिमेड पणत्या बाजारात मोठ्या प्रमाणात विक्री येतील. आणि कुंभार काम करणाऱ्या समाज बांधवांचे मोठे नुकसान होईल अशी भिती व्यक्त केली जात आहे.

# खड्ड्यांमुळे होणाऱ्या अपघातग्रस्ताच्या कुटुंबाला मिळणार ६ लाख रुपये - प्रा.डॉ.जयपाल पाटील




दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**पेण** : रायगड जिल्हा जगाच्या नकाशावर पर्यटन जिल्हा घोषित झाल्यापासून अलिबाग तालुक्यात प्रचंड पर्यटकांचा ओघ वाढला असून जाणे-येणे पेझारी येथून असते येथे शहापूर, कुर्डुस कडून वाहतूक वाढली असून अपघाताचे प्रमाण वाढत आहे. मात्र आता रस्त्यावरील खड्ड्यांमुळे दोन चाकी,चार चाकीचा अपघात होऊन मृत्यु झाल्यास 6लाख रुपये आणी जखमींना रुपये 50हजार ते 2 ते 50लाख मिळणार असल्याचे मुंबई उच्च न्यायालयाच्या न्याय मुत्री श्रीमती रेवती मोहिते आणी न्यायमुत्री संदेश पाटील यांच्या खंडपीठाने दिला असल्याची माहीती आंबेपुर ग्रामपंचायत ने आयोजित केलेल्या आपत्ती सुरक्षा कार्यशाळेत आपत्तीव्यवस्थापन तज्ञ प्रा.डॉ.जयपाल पाटील यांनी सांगितले.

स्व. मीनाक्षी पाटील सभागृहात व्यासपीठावर प्रशासक समीर पाटील, डॉ.जयपाल पाटील अँड. गोपाळ शेळके,ग्रामविकास अधिकारी विलास म्हात्रे हे उपस्थित राहुन मान्यवरांकडून छत्रपती शिवाजीमहाराज व सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून मान्यवरांचे शाल,श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सन्मान केला.प्रास्ताविकात समीर पाटील म्हणाले पेझारी नाका चहूबाजूने गजबजला असुन हायस्कूल मुळे शेकडो विद्यार्थी येतात त्या मुळे अपघात झाल्यास काय करावे,घरातील सिलेंडर, वीज बाबत सुरक्षेबाबत ग्रामपंचायत ने जागतिक पातळीवर प्रशिक्षण घेतलेले डॉ.जयपाल पाटील यांना आमंत्रित केले असून ते माहिती देतील ती शेजारांना सांगावी असे सांगितले.

यानंतर महिलांविषयक नवे कायदे अँड. गोपाळ शेळके यांनी दिली.महिला सुरक्षेसाठी पोयनाड पोलीस ठाण्यातून पोलीस हवालदार नवनाथ म्हात्रे यांनी सुरक्षेसाठी महाराष्ट्र पोलीस 112क्रमांकाचा वापर कसा करावा बाबत माहीती दिली.महिलांना बाळंतपणातशासनामार्फत 102 रुग्ण वाहिकेचा प्राथमिक आरोग्य केंद्र पेझारी प्रमुख डॉ.पदश्री आंदळकर यांनी वाहन चालक श्री.प्रमोद पाटील यांना 102 घेऊन पाठविले.रस्त्यावरील अपघाता बाबत न्याय मुत्री महोदयाने नुकसान भरपाई 6ते8आठवडयातच देण्यात यावी.अपघाताला जबाबदार ठेकेदार व शासकीय अधिकारी असुन याला शहरात स्थानिक स्वराज्य संस्था व बाहेर सार्वजनिक बांधकाम विभाग असणार आहेत या महत्वपूर्ण निकालाचे नागरिक अभिनंदन करतानां नाक्यावर दिसत आहेत. त्या बरोबर घरातील गॅस सिलेंडर, वीज, याची माहीती,व रुग्णवाहिकेपर्यंत रुग्णास कसे हाताच्या घडीवर, चादरीत नेण्याचे प्रात्यक्षिक करून दाखविले यावेळेस आशाताई विदया म्हात्रे, सिद्धी पालक,अंगणवाडी सेविका रुपाली खंडागळे, स्वेता केळकर,ग्रामपंचायत कर्मचारी उपस्थित होते शेवटी आभार ग्रामविकास अधिकारी विलास म्हात्रे यांनी मानले.

# नुतन विद्यालयात साकारले युनेस्को यादीत समाविष्ट १२ किल्ले

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : महाराष्ट्रातील ११ आणि तामिळनाडूतील १ छत्रपती शिवाजी महाराजांच्या या १२ किल्ल्यांना युनोस्कोच्या जागतिक वारसा स्थळांच्या यादीत समाविष्ट करण्यात आले आहे. या यादीमध्ये रायगड, प्रतापगड, पन्हाळा, शिवनेरी, लोहगड, सोल्हेर, सिंधुदुर्ग, विजयदुर्ग, सुवर्णदुर्ग, खांदेरी हे महाराष्ट्रातील किल्ले आणि जिंजी हा तामिळनाडूतील किल्ला समाविष्ट आहे. कल्याणच्या कर्णिक रोड नूतन विद्यालय शाळेने दीपोत्सवानिम्मित शाळेत हे १२ किल्ले सकारत या किल्यांचे भव्य प्रदर्शन भरवले आहे.



मुख्याध्यापिका रेश्मा सय्यद यांच्या मार्गदर्शनाखाली शाळेतील विद्यार्थ्यांच्या सहकार्याने माती व दगड, विटा आणि अन्य सामग्री एकत्र करून रोटरी क्लब ऑफ कल्याणच्या सहकार्याने, परिश्रमाने, शिक्षकांच्या सोबतीने हे किल्ले बनविले आहेत. १२ किल्ले शाळेच्या भव्य पटांगणात बनवण्यात आले असून सलग २ दिवसाच्या परिश्रमानंतर विद्यार्थी मित्र मौत्रिणींनी हे किल्ले उभारले आहेत. शाळेतर्फे सर्व पालकांना व नागरिकांना जागतिक १२ किल्ल्यांचे एकत्रित दर्शन व्हावे यासाठी दीप उत्सव हा विशेष उपक्रम राबविण्यात आला. कल्याणकरांसाठी हे किल्ले प्रदर्शन २० ऑक्टोबरपर्यंत खुले असणार आहे.

या उपक्रमासाठी रोटरी क्लब ऑफ कल्याणच्या अध्यक्षा रुईता सपकाळे, सचिव जय राठोड, प्रकल्प प्रमुख निखिल चौधरी, माजी प्रांतपाल मिलिंद कुलकर्णी, माजी अध्यक्ष अरुण सपकाळे, दीपक पटेल आदींचे सहकार्य लाभले. तर यावेळी संस्था पदाधिकारी उपाध्यक्ष प्रा. ना के. फडके, अविनाश नेवे, भारती वेदपाठक, दीपाली साबळे, अनिल बोरनारे आदींसह शाळेतील सर्व पालक, मान्यवर आणि छत्रपती शिक्षण मंडळाचे पदाधिकारी यांच्या उपस्थितीत जल्लोशात दीपोत्सव साजरा करण्यात आला. नूतन विद्यालय नेहमीच नावीन्यपूर्ण उपक्रम राबवत असते. अशा अनोख्या उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांना नवनवीन संधी उपलब्ध होतात असे गौरव उदगार उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केले असल्याची माहिती शुभांगी भोसले यांनी दिली.

# शहापूर पोलीसांच्या वतीने सायबर जनजागृती सप्ताह कार्यक्रम

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**शहापूर ग्रामीण** : शहापूर पोलीस स्टेशनच्या वतीने धर्मवीर आनंद दिघे हायस्कूल येथे नशा मुक्त अभियान व सायबर जनजागृती सप्ताह या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.




विद्यार्थ्यांना नशा मुक्ती व होणाऱ्या सायबर फसवणूक या संदर्भात योग्य मार्गदर्शन मिळावे यासाठी ठाणे ग्रामीण पोलीस अधिक्षक डॉ. डी एस स्वामी, अप्पर पोलीस अधीक्षक अनमोल मित्तल, उपविभागीय पोलीस अधिकारी मिलिंद शिदे, पोलीस निरीक्षक मुकेश ढगे यांच्या मार्गदर्शनाखाली शहापूर पोलिस ठाण्याच्या वतीने हा उपक्रम राबविण्यात आला होता.

### पोलिस ठाण्याच्या वतीने कार्यक्रमाचे आयोजन

यामध्ये पोउनि मोहिनी कपिले, पो.ह.चंद्रभागा पवार, गंभीर जाधव, संतोष तांबोळी यांनी येथील शालेय विद्यार्थ्यांना नशा मुक्त शाळा अभियान व सायबर जनजागृती सप्ताह संदर्भात जनजागृतीपर माहिती दिली तसेच भारत नशा मुक्त होऊन सायबर बाबत ज्या फसवणूक होत आहेत त्याच्यापासून सर्वांचा बचाव होण्यासाठी योग्य ते मार्गदर्शन केले. तर यासाठी शाळेचे शिक्षक -शिक्षिकेतर, कर्मचारी यांचे सहकार्य लाभले.

# प्रसाद चिकित्सा संस्थेकडून महिला शेतकरी दिन साजरा

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**झिडके-अंबाडी** : भिवंडी तालुक्यातील मौजे-उसगाव बंधारा येथे " राष्ट्रीय महिला शेतकरी दिनाचे " औचित्य साधून जवळपास 66 आदर्श व कर्तृत्ववान महिला शेतकऱ्यांचा विशेष सत्कार करण्यात आला.व त्यांना शेती कामासाठी लागणारी " विळी " ही भेटवस्तू खासकरून देण्यात आली.महिला शेतकरी आपल्या शेतीमध्ये वर्षभर काबाडकष्ट करीत असतात,परंतु त्या आपल्या आरोग्याकडे काही प्रमाणात दुर्लक्ष करीत असतात, त्यामुळेच आरोग्यविषयक समस्यांना त्यांना सामोरे जावे लागते.या त्यांच्या समस्यां भविष्यात निर्माण होऊ नये याची दक्षता घेऊन प्रसाद चिकित्सा संस्थेकडून याच कार्यक्रमात आरोग्यविषयक तपासणी हाही उपक्रम यानिमित्ताने राबविला. यामध्ये हिमोग्लोबीन,नेत्रतपासणी करून उपस्थित महिलांना हाही संदेश दिला की,शेतीमध्ये शारीरिक श्रमाचे काम करीत असतानाच, आपल्या आरोग्याकडे दुर्लक्ष करता कामा नये की,भविष्यात आपण मोठ्या आजाराचा बळी ठरू.

एकंदरीत प्रत्येक कुटुंबात संसाररूपी रहाटगाडा चालविण्यासाठी महिलांचे योगदान पुरूषांच्या बरोबरीने अंत्यत महत्त्वपूर्ण आहे. आणि याच आरोग्यविषयक बाबींवर प्रसाद चिकित्सा संस्था गणेशपुरी परिसरात विशेष काम करीत आहे.त्याचबरोबर ग्रामीण भागातील गरीब व दुर्लक्षित समाजघटक यासाठीच आपले महत्त्वपूर्ण योगदान देत आहेत,त्यातून च परिसरात विद्यार्थी,शेतकरी,बेरोजगारांसाठी स्वयंरोजगार निमित्ताने शेतीव्यवसायक उपक्रम राबवून निसर्ग संवर्धन आदिबाबत विशेष मार्गदर्शन नेहमीच राबवून शेतकऱ्यांना शेतीव्यवसायात आवड निर्माण करण्याचे बहुमोल कार्य प्रसाद चिकित्सा संस्थेकडून केले जात आहे.

# ऐन दिवाळीत टावरी पाड्यात कचऱ्याचे ढीग

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : सणासुदीला ऐन दिवाळीत कल्याण पश्चिमेतील टावरी पाडा शंखेश्वर प्रेसिडेन्सी येथे सोसायट्यांच्या बाहेर कचऱ्याचा ढीग साचला आहे. पालिकेची गाडी येत नसल्यामुळे कचरा जमा झाला आहे. याबाबत येथील नागरिकांनी सातत्याने फोन करूनही पालिकेची गाडी येत नाही. आठवल्यातून 3 ते 5 दिवसाआड गाडी येते. या मोठ्या सोसायटीत 610 फ्लॅट आहेत. प्रत्येक दिवशी एवढ्या मोठ्या सोसायटीत कचरा उचलण्यासाठी रोज गाडी येणे अपेक्षित आहे परंतु गाडी तीन ते पाच दिवसाआड येत असते यामुळे सोसायटीमध्ये प्रत्येक सोसायटीच्या मेन गेटवर असा कचऱ्यांचा खच पडलेला असून संपूर्ण सोसायटीचे विद्रूपीकरण झालेले आहे.



तसेच घाणीचे साम्राज्य पसरलेले असून त्या माध्यमातून असंख्य प्रकारचे आजार पसरायला सुरुवात झालेली आहे. परिसरात येता-जाता दुर्गंधी ला सामोरे जावे लागते. पालिकेला सहाशे रुपये स्वच्छतेसाठी कर भरला जातो आणि तरीही सोसायट्यांची अशी दुरावस्था आहे. जर कर भरूनही सुविधा मिळत नसेल तर कर का म्हणून भरला जावा असा सवाल स्थानिक रहिवासी विनोद शेलकर यांनी उपस्थित केला आहे.



### नरक चतुर्दशी निमित्त
## सर्व वाचकांना शुभेच्छा

# ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयाकडून माणुसकीची दिवाळी

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : यावर्षी अतिवृष्टीमुळे मराठवाड्यासह महाराष्ट्र राज्यातील अनेक भागातील शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले आहे. त्यांना मदत करण्यासाठी म्हणून महाराष्ट्र शासनासह विविध संस्था, व्यक्ती पुढे सरसावले आहेत. ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयही या मदतकार्यात क्यू आर कोडच्या माध्यमातून पुढे सरसावले आहे.

दिवाळीच्या पहिल्याच दिवशी जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ यांच्या मार्गदर्शनाखाली आणि अपर जिल्हाधिकारी हरिश्चंद्र पाटील, निवासी उपजिल्हाधिकारी डॉ.संदीप माने, जिल्हा नियोजन अधिकारी वैभव कुलकर्णी, उपजिल्हाधिकारी (सामान्य प्रशासन) रुपाली भालके, उपजिल्हाधिकारी (पुनर्वसन) सर्जेराव मस्के-पाटील, उपजिल्हाधिकारी (रोहयो) शशिकांत गायकवाड,



उपजिल्हाधिकारी (निवडणूक) वैशाली माने, जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख नितीन पाटील, प्रांताधिकारी उर्मिला पाटील, तहसिलदार रेवण लेंभे, सचिन चौधर, संदीप थोरात, अमोल कदम, प्रदिप कुडाळ, उज्वला भगत, निलेश गौड, मुकेश पाटील, जिल्हा खनिकर्म अधिकारी विवेक घुले यांच्या पुढाकारातून जिल्हाधिकारी कार्यालय आणि सर्व प्रांत व तहसिल कार्यालय यांनी दिवाळी फराळ कार्यक्रमासोबतच “एक हात पूरग्रस्तांच्या मदतीकरिता” याअंतर्गत “माणूसकीची दिवाळी” हा उपक्रम राबविला.

### पूरग्रस्तांच्या मदतीसाठी क्यू आर कोड द्वारे अधिकारी-कर्मचाऱ्यांनी केले स्वेच्छा निधी संकलन

यावेळी अनेक अधिकारी-कर्मचाऱ्यांनी "मुख्यमंत्री सहायता निधी" कक्षाच्या बँक खात्यावर क्यू आर कोडच्या माध्यमातून स्वेच्छा निधी थेट जमा केला. पहिल्याच दिवशी हा निधी जवळपास एक लाख रुपयांच्या आसपास पोहोचला. शासन आणि प्रशासन हे नेहमीच नागरिकांच्या कल्याणाकरिता अहोरात्र प्रयत्न करीत असते, त्यासाठी हे देखील कर्तव्य आणि माणुसकीच्या भावनेतून केलेले एक छोटेसे योगदान असल्याचे यावेळी जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ यांनी म्हटले.

news.thanejeevandeep@gmail.com
दैनिक ठाणे जीवनदीप
WhatsApp Channels
महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक
दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
मुंबई ■ नवी मुंबई ■ ठाणे ■ पालघर ■ रायगड
9619188558 / 9082664781
www.jeevandeepvarta.com/
आपलं हक्काचं दैनिक, दररोज वाचा.




जीवनदीप शैक्षणिक संस्था,पोई संचलित
जीवनदीप कौशल्य विकास केंद्र गोवेली
कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग संचलित
प्रवेश सुरु! प्रवेश सुरु! प्रवेश सुरु!

| | | |
|---|---|---|
| १ | बांधकाम पर्यवेक्षक (कोड नं.३०४२०२) | कालावधी १ वर्ष |
| २ | पॅथोलॉजी टेक्नीशियन (कोड नं.२०१२३०) | कालावधी १ वर्ष |
| ३ | जनरल नर्सिंग आणि मिडवाइफरी असिस्टंट (GNMA) (कोड नं.२०१२३७) | कालावधी १ वर्ष |
| ४ | डिप्लोमा कोर्स इन मेडिकल लॅब टेक्निशियन (DMLT) (कोड नं.२०१४०४) | कालावधी २ वर्ष |
| ५ | सिक्युरिटी ॲण्ड फायर प्रिव्हिजन प्रशिक्षण (कोड नं.४११११२४) | कालावधी ६ महिने |

पात्रता : १० वी / १२ वी / पदवी
संपर्क : जीवनदीप कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय गोवेली, पो.रायते, ता.कल्याण, जि.ठाणे
Call : 8108559566 / 9158518832 / 9619188558

*Printed by SIDDHAKALA PRINT SOLUTION LLP Published by GHODVINDE RAVINDRA NARAYAN on behalf of GHODVINDE RAVINDRA NARAYAN,*
*Printed at Thane and published at Building No-B-24, Room no-9, Gholap Nagar, Murbad Road, Near Anupam Nagar, Kalyan (West). Editor GHODVINDE RAVINDRA NARAYAN.*
*Contact No. - 908266 4781 / 9619188558 E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com * RNI NO : MAHMAR/2016/72091 * Postal Reg. No. THC/256/2022-2024*